MCAER
कृषी परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई मेल - edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ-www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/७८४/३३५७ दि.२३ ऑक्टोबर,२०२६

संदर्भ : (१) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/७४२/३१३३, दि.३०/०९/२०२६
(२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/७४४/३१४१, दि.०४/१०/२०२६

## परिपत्रक

**विषय:- पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२६-२७**
**तिसऱ्या प्रवेश फेरीअंतर्गत दुसऱ्या आणि शेवटच्या दिवसाची स्थगित केलेली प्रवेश फेरी कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी राबविण्याबाबत.**

सन २०२६-२७ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत तिसऱ्या प्रवेश फेरीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या दिवसाची प्रवेश प्रक्रिया चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी दि.०५/१०/२०२६ ते दि.१२/१०/२०२६ या कालावधीत राबविणेबाबत दि.३०/०९/२०२६ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

तथापि, संदर्भ क्र.२ येथील दि.०४/१०/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर प्रवेश फेरी तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

याअनुषंगाने उक्त तात्पुरती स्थगित करण्यात आलेली तिसऱ्या प्रवेश फेरीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या दिवसाची प्रवेश प्रक्रिया चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी खालील दिनांकास राबविण्यात येणार आहे, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

| कृषी विद्यापीठाचे नाव | तिसऱ्या प्रवेश फेरीचा दिनांक |
|---|---|
| डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | दि. २६/१०/२०२६ |
| महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहिल्यानगर | दि. २८/१०/२०२६ |
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | दि. ३०/१०/२०२६ |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | दि. ०२/११/२०२६ |

उक्त जागेवरील प्रवेश फेरीद्वारे भरावयाच्या जागांचा तपशील **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर प्रवेश फेरीपूर्वी विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास रिक्त होणाऱ्या जागांचा वरील प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात येईल.

सन २०२६-२७ हया शैक्षणिक वर्षाच्या अंतिम गुणवत्ता यादी (सुधारीत) मध्ये समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार उक्त प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रविष्ठ होण्यास पात्र असतील. अशा पात्र उमेदवारांनी तसेच चारही कृषी विद्यापीठांतील प्रवेश प्रक्रियेशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) उमेदवाराने रिक्त जागांचा तपशील विचारात घ्यावा आणि ज्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यास इच्छुक आहे, अशा कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी उमेदवाराने सकाळी ९.०० ते ११.०० या कालावधीत आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उपस्थित राहावे.

(२) कृषी विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी आणि सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

(३) प्रथमतः बिंदुनामावलीतील बिंदुचा क्रम व त्यानुसार उपलब्ध जागा विचारात घेऊन संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेप्रमाणे प्रवेश देण्यात यावेत. यानंतर बिंदुचा क्रम नसलेल्या रूपांतरीत (CR, CO) जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत.

(४) संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील **रूपांतराच्या कार्यपध्दतीनुसार** अशा रिक्त जागांवर उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना **गुणानुक्रमाने** प्रवेश देण्यात यावेत.

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर विद्यापीठाच्या 'लॉग इन'द्वारे संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा. यासाठी संकेतस्थळावरील संबंधित कृषी विद्यापीठाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध असेल.

(६) उमेदवाराची योग्य ती कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क स्वीकारण्यासाठी प्रत्येक कृषी विद्यापीठाने योग्य ती व्यवस्था करावी.

(७) व्यवस्थापन कोटयामधील रिक्त जागा भरण्याविषयी संबंधित विना अनुदानित महाविद्यालयाने त्यांच्यास्तरावर नियमानुसार प्रक्रिया करावी.

23.10

**(राहुल महिवाल)**
**महासंचालक**

**प्रत कार्यवाहीसाठी:-**

(१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

(२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की,सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

(३) मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकाबाबत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादी (सुधारीत) मधील सर्व उमेदवारांना, महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये तसेच संकेतस्थळावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.